# गजानन महाराज विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती



**दैनिक जागर मराठी प्रतिनिधी-**

**महान** - येथील गजानन महाराज विद्यालयात सायबर सुरक्षा जन जागृती कार्यक्रम घेण्यात आला होता. सदर कार्यशाळेत विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करून मोबाइलचा योग्य उपयोग करण्यासाठी शपथ देण्यात आली. ही कार्यशाळा शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोलाचे प्राचार्य डॉ. जे. एम. साबू, समन्वयक डॉ. दीप्ती पेटकर यांच्या सहयोगाने घेण्यात आली होती. विद्धयाल्याचे मुख्यद्यापक सतिश परळीकर सर यांनी सायबर सुरक्षा जन जागृती कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये जबाबदार डिजिटल सवयी विकसित होतात असे कार्यक्रमावेळी आपले मनोगत व्यक्त केले..डिजिटल युगात कसे फ्रॉड आणि फसवेगिरी होतात या विषयावर जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमात शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे सायबर वॉरियर्स कु.अदिती जानोरकार व तनुजा घोगरे यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाइन सुरक्षिततेचे महत्त्व पटवून सांगितले. सोशल मीडियाचा योग्य वापर, वैयक्तिक माहितीचे संरक्षण, फसवे संदेश ओळख. अशी माहिती देण्यात आली.या वेळी शाळेचे शिक्षक बोचरे,देशमुख, झंझाड, मेंढे,राऊत, शिक्षिका सरोदे,वाघमारे,राठोड सह अन्य शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि वर्ग 5 ते 10 चे विद्यार्थी,विद्यार्थिनी उपस्थित होते.